महाराष्ट्र शासन

# उद्योग संचालनालय

## जिल्हा उद्योग केंद्र गडचिरोली
## नागपूर विभाग

## १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम

# ❖ संकेतस्थळ

➢ **वापरण्यातील सुलभता:**

उद्योग संचालनालयाचे di.maharashtra.gov.in , https://maitri.maharashtra.gov.in आणि जिल्हाचे https://gadchiroli.gov.in/ संकेतस्थळ वापरण्यास सुलभ.

➢ **माहितीचे अद्ययावतीकरण**

- मैत्री २.० पोर्टलच्या संकेतस्थळावर जिल्ह्याचे औद्योगिक प्रोफाईल, जिल्हा निर्यात कृती आराखडा, जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या बैठकांचे इतिवृत्त तसेच निर्यात डॅशबोर्ड या टॅबवर अद्ययावत माहिती
- जिल्हाचे संकेतस्थळावर ODOP व निर्यात संबद्धित अद्ययावत माहिती

➢ **माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वंयप्रकटीकरण करण्यात आलेले आहे.**


➢ **सुरक्षितता :**

संकेतस्थळ सुरक्षित आहे.

➢ **लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचित करुन ऑनलाईन प्रसिध्द करणे.**

उद्योग ऊर्जा कामगार विभागाच्या शासन निर्णय दि. २३.०७.२०१५ नुसार लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत सेवा अधिसूचित करून Notified Services या संकेतस्थळावर प्रसिद्ध





One District One Product


ONE DISTRICT ONE PRODUCT

About:

The ODOP Initiative is aimed at manifesting the vision of the Hon'ble Prime Minister of India to foster balanced regional development across all districts of the country. The idea is to select, brand, and promote One Product from each District (One District – One Product) of the country for enabling holistic socioeconomic growth across all regions. The range of the chosen products varies across the length and breadth of the country while also touching upon multiple sectors with existing clusters and communities that have already created a niche identity for themselves. The mandate of the ODOP initiative includes identifying, understanding, and solving problems associated with each of the chosen products at all points in their respective supply chains, improving the market accessibility of the chosen products, and dedicated handholding of the producers to harness the full potential of the chosen products.

ODOP Products

As part of the initiative, the Gadchiroli district has nominated 'Rice' and 'Minor Forest Produce' as its flagship products and is working towards solving problems associated with it's supply chains, improving the market accessibility and dedicated handholding of the producers so as to harness the full potential of the Minor Forest Produce and Rice and associated by-products. This initiative envisions the holistic socioeconomic growth across the district.

# सुकर जीवनमान

- MAITRI पोर्टल वर 15 विभागांमधील 119 सेवा एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर एकत्रित करते तसेच प्रशासकीय अडथळे कमी करून आणि रिअल टाइम ॲप्लिकेशन ट्रॅकिंग सक्षम करून गुंतवणूक प्रक्रिया सुव्यवस्थित

- उद्योग घटकांशी वेळोवेळी संपर्क साधून उद्योग स्थापना व परिचालन संबंधी प्राप्त करावयाच्या विविध परवानग्या व अनुज्ञप्ती सहज व वेळेत प्राप्त होण्याच्या अनुषंगाने पाठपुरावा

- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत इच्छुक व जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधणा-या अर्जदारांना ऑनलाईन अर्ज जिल्हा उद्योग केंद्रामार्फत नि:शुल्क भरुन देण्याची सुविधा

# स्वच्छता

- अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण करण्यात आले आहे.
- मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे : सदर कार्यवाही चालू आहे.
- जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण करण्यात आले आहे.
- जुन्या व निरुपयोगी जड वस्तूंची विल्हेवाट: सदर कार्यवाही चालू आहे
- जुन्या वाहनांचे निर्लेखन: जुन्या वाहनाचे निर्लेखन झालेले आहे

**Before:**




**After:**



# तक्रार निवारण

- आपले सरकार पोर्टलवर दिनांक 17 एप्रिल 2025 पर्यंत प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे (100 % ) निराकरण करण्यात आले असून , त्यामुळे सद्य:स्थितीत एकही तक्रार प्रलंबित नाही.
- पी जी पोर्टलवर दिनांक 17 एप्रिल 2025 पर्यन्त प्राप्त झालेल्या 1 तक्रारींपैकी 1 (100%) प्रकरणाचे निराकरण करण्यात आले.



- अभ्यागत भेटीचे नियोजन करण्यात आलेले आहे आणि प्रसिद्धी पत्रक लावण्यात आलेला आहे

- लोकशाही दिनमधील एकही तक्रार प्रलंबित नाही



# कार्यालयातील सोयी व सुविधा

कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.




महिला कर्मचारी व अभ्यागत यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा करण्यात आलेली आहे.





.

पुरुष कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा करण्यात आलेली आहे




- अभ्यागत साठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था करण्यात आली आहे
- कार्यालयामध्ये  नामफलक, दिशादर्शक फलक लावण्यात आलेला आहे आणि कार्यालयाचे सौंदर्यकरण करण्यात आलेले आहे




# BEFORE




MITCON
उद्योजक, बेरोजगार,
विद्यार्थ्यांकरीता
मार्गदर्शन व प्रशिक्ष
प्रकल्प अधिकारी
मो. ८६९८९४८७८६



मोदी सरकारची हमी
पीएम विश्वकर्माच्या माध्यमातून
कौशल्याचा सन्मान
Modi Sarkar ki Guarantee
Honouring the talent through
PM Vishwakarma
जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली

# AFTER












आपले सरकार
सुचना फलक
(महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५)
महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ मधील तरतुदींनुसार अधिसुचना केलेल्या सेवांबाबत तपशिल
कार्यलयाचे नांव : महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,MIDC रोड, गडचिरोली
अ. क्र.
अधिसुचित लोकसेवेचा तपशिल
लोकसेवा पुरविण्यासाठी निर्धारीत शुल्क
लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा
पदनिर्देशित अधिकारी
प्रथम अपिलीय प्रधिकारी
द्वितीय अपिलीय प्राधिकारी
१ सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ मुद्रांक शुल्क सवलत
नाही
७ दिवस
महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, MIDC रोड, गडचिरोली-४४२६०५
उद्योग सह संचालक, नागपूर विभाग नागपूर २ रा माळा उद्योग भवन सिव्हील लाईन्स नागपूर-४४०००१
विकास आयुक्त उद्योग/ अतिरिक्त उद्योग संचालक, उद्योग संचालनालय, २ रा माळा नविन नविन प्रशासकिय इमारत मंत्रालयासमोर मुंबई ४०००३२
२ सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत पात्रता प्रमाणपत्र देणे
नाही
३० दिवस
३ सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत औद्योगिक प्रोत्साहन अनुदान
नाही
१५ दिवस
४ अनुदान वाटपाची पध्दती
नाही
उद्योग संचालनाकडे निधी प्राप्त झाल्यानंतर ३० दिवस
५. खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांना इरादापत्र देणे
नाही
१० दिवस
६. खाजगी माहिती तंत्रज्ञान घटकांना नोंदणी प्रमाणपत्र देणे.
नाही
७ दिवस
७. खाजगी जैव तंत्रज्ञान उद्यानांना इरादापत्र देणे.
नाही
१० दिवस
८. खाजगी जैव तंत्रज्ञान घटकांना नोंदणी प्रमाणपत्र, देणे.
नाही
७ दिवस
सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम अंतर्गत उद्योजकांसाठी एंटरप्रायजेस मेमोरँडम भाग - I
नाही
२ दिवस
सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम अंतर्गत उद्योजकांसाठी एंटरप्रायजेस
नाही
२ दिवस
http://www.udyogaadhar.gov.in


माहीतीचा अधिकार अधिनियम - २००५
जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली
शासकिय माहिती अधिकाऱ्याचे नांव पदनाम व दुरुध्वनी क्रमांक
प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे नांव पदनाम व दुरुध्वनी क्रमांक
श्री अभिषेक पाटोळे
उद्योग निरीक्षक
जिल्हा उद्योग केंद्र गडचिरोली
Mob : 8902428553
निलेश गायकवाड
महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र गडचिरोली
Mob : 7972129030

# क्षेत्रीय कार्यालयांना भेटी

- आठवड्यातून किमान २ दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन पाहणी करणे

- जिल्ह्यातील उद्योग क्षेत्राशी संबंधित असलेल्या कार्यालयांना, बँक शाखांना, विभागीय व्यवस्थापकांना व म.औ.वि.म. क्षेत्रांना महाव्यवस्थापक व उद्योग निरीक्षक यांच्या भेटी.





- **केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्वाच्या कार्यक्रम / प्रकल्पांना भेटी देऊन अंमलबजावणी व पर्यवेक्षण करणे**

  - CMEGP योजनेच्या लाभार्थ्यांच्या मार्जिन मनी दाव्याच्या अनुषंगाने प्रकल्प स्थळ पाहणी व PMEGP योजनेच्या मार्जिन मनी समायोजनासाठी प्रकल्प स्थळ पाहणी

- **क्षेत्रीय भेटी दरम्यान झाम् पंचायत्, शाळा, अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेटी देऊन कामकाजावर देखरेख ठेवणे**

- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत 'एक गाव एक उद्योजक' ही संकल्पना राबविण्यात येत असून् सदर योजनेचा प्रचार व प्रसिद्धी ग्रामपंचायत व गावातील माध्यमिक शाळांमध्ये करण्यात येते.





# ई-ऑफीस प्रणाली

- ई -ऑफिस कार्यप्रणालीचा वापर करण्यासंदर्भात राज्यस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

- ई ऑफिस प्रणाली कार्यान्वित झाल्यावर 4 किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा करण्यात येईल

# आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

## ➢ गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे

- उद्योग विभागाच्या योजना व धोरणांबाबत गुंतवणूकदार उद्योजकांना जिल्हा उद्योग  केंद्रातर्फे मार्गदर्शन
- उद्योजकांना परिपूर्ण सहकार्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा उद्योग केंद्र समवेत मिळून जिल्हा उद्योजक मदत कक्षाची स्थापना
- जिल्हास्तरीय  गुंतवणूक  परिषद 11/04/2025 मध्ये 66 गुंतवणूकदारांशी 493 कोटींचे सामंजस्य करार
- निर्यातक्षम उद्योगक्षेत्रांत गुंतवणूक वाढवण्यासाठी निर्यात प्रोत्साहन कार्यशाळा 24/01/2025






## ➢ व्यापारी व कामगार वर्गाच्या संघटनांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडविणे

- 28 मार्च 2025 रोजी अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली उद्योजकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा झाली. MIDC व इतर उद्योजकांचे प्रश्न अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सोडवण्यात आले.

- 30/01/2025 रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गुंतवणुकीतील अडथळ्यांवर चर्चा होऊन विद्युत जोडणी देण्याची महावितरणने हमी दिली.

- जानेवारी ते मार्च 2025 दरम्यान 25-30 उद्योजकांनी उद्योग विभागाच्या योजनांसाठी जिल्हा उद्योग केंद्रात भेट दिली.या भेटीत उद्योजकांच्या शंका व समस्यांचे समाधान करण्यात आले.

## ➢ गुंतवणूक उद्योजकाच्या अडचणीचे निराकरण करणे

- जिल्हा उद्योग मित्र समिती सभा, जिल्हा सल्लागार समिती सभा, आजारी उद्योग पुर्नवसन समिती सभा, स्थानिक लोकांना रोजगार प्राधान्य समिती सभा, 30/01/2025
- व्यवसायासाठी लागणाऱ्या सुविधा – वीज, पाणी, जागा – यावर प्रशासनाशी समन्वय
- औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर चर्चा





## ➢ गुंतवणूकदार उद्योजकांसाठी प्रक्रियेचे सुलभीकरण करणे

१.उद्योजकांसाठी CMEGP कार्यक्रमाची पूर्णतः ऑनलाइन प्रकिया- अतिशय सोपी आणि सुलभ अमलबजावणी
२. उद्योजकांसाठी उद्योग निगडित सर्व विभाग एकाच छत्राखाली आणण्यासाठी स्वतंत्र उद्योग भवन इमारत बांधकाम सुरू
३.DLTFC सभेत बोलताना जिल्हाधिकारी यांनी वित्तीय संस्थांना उद्योजकांना सुलभ कर्ज देण्याचे आवाहन करण्यात आले. गडचिरोली जिल्हा बँकेने जामीनदाराची अट शिथिल केल्याने छोट्या उद्योजकांना कर्ज मिळणे सोपे झाले.
४. शासकीय परवाने, गुंतवणूक मार्गदर्शन, समस्यांचे निराकरण इ. साठी MAITRI 2.0 पोर्टल बाबतचा उद्योजका मध्ये प्रचार आणि प्रसार





नवराष्ट्र
www.navarashtra.com

**उल्लेखनीय कामगिरी ● 485 नवउद्योजकांना मंजुरी; 100 टक्के उद्दिष्टपूर्ती**

# मुख्यमंत्री रोजगारनिर्मितीत जिल्हा अग्रेसर

गडचिरोली, ब्युरो. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमांतर्गत गडचिरोली जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत 100 टक्के उद्दिष्टपूर्ती साधली आहे. जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली या योजनेची यशस्वी अंमलबजावणी झाली. जिल्ह्यातील 485 नवउद्योजकांचे कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत.



## या बँकांचा सक्रिय सहभाग

विविध बँकांनी या योजनेसाठी सक्रिय सहभाग नोंदवला असून, बँक ऑफ महाराष्ट्र आणि स्टेट बँक ऑफ इंडियाने प्रत्येकी 129 प्रकरणे, बँक ऑफ इंडियाने 86, विदर्भ कोकण ग्रामीण बँकेने 64 आणि गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती बँकेने 52 प्रकरणांना मंजुरी दिली आहे.

जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक नीलेश गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, या नवउद्योजकांना वित्तपुरवठा करण्यात आला असून, त्यांना अनुदान (सबसिडी) देखील मिळवून देण्यात जिल्हा अग्रेसर ठरला आहे. जिल्हाधिकारी पंडा यांनी नियमितपणे बैठका घेऊन योजनेची प्रगती तपासली. बँकांनी देखील त्यांना दिलेल्या उद्दिष्टांचे वेळेत पालन करत सहकार्य केले. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व बँकांचे कौतुक करीत आगामी काळातही अशाचप्रकारचे सहकार्य अपेक्षित असल्याचे सांगितले.

मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमासह केंद्र शासनाच्या पंतप्रधान रोजगारनिर्मिती कार्यक्रमासाठीही जिल्ह्यातील बँकांचा सकारात्मक दृष्टिकोन असल्याचे स्पष्ट झाले आहे. ही योजना राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींसाठी उद्योग उभारणीसाठी अनुदान व आर्थिक सहाय्य पुरवते. त्यामुळे या योजनांचा लाभ अधिकाधिक बेरोजगारांनी घ्यावा, असे आवाहन गायकवाड यांनी केले.

गडचिरोली जिल्ह्यात स्थानिक व बाहेरील उद्योजकांसाठी गुंतवणुकीला पोषक वातावरण निर्माण झाले आहे. बँकांकडून उद्योगांसाठी आवश्यक असलेली पतनिर्मिती तत्परतेने करण्यात येत असल्याचे अग्रणी बँकेचे व्यवस्थापक प्रशांत धोंगडे यांनी सांगितले.

**यांनी बजाविली मोलाची भूमिका :** या यशस्वी अंमलबजावणीसाठी अग्रणी बँक व्यवस्थापक, सर्व बँकांचे जिल्हा समन्वयक, शाखा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी-कर्मचारी, खादी ग्रामोद्योग मंडळाचे अधिकारी मेश्राम व कर्मचारी, जिल्हा परिषदेची उमेद (एमएसआरएलएम), माविम, तसेच मिटकॉन आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) या प्रशिक्षण संस्थांनी मोलाची भूमिका बजावली.

Gadchiroli Plus Edition
Apr 05, 2025 Page No. 1
Powered by: Navarashtra.com

## अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

- नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे लागु नाही.
- पदोन्नत्या व कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निराकरण करणे
  - पदोन्नतीची कार्यवाही विभागीय कार्यालय व मुख्यालयामार्फत राबविण्यात येते. तसेच स्थानिक कर्मचा-याच्या तक्रारींचे विभागीय कार्यालय व मुख्यालयाशी पत्रव्यवहार करून नियमित निराकरण करण्यात येते.
- कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञान वापरण्यासाठी अधिकारी/ कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे
  - आस्थापनेवरील कर्मचारी व अधिकारी यांना Meta, Google Assistant, Gemini, ChatGPT या ॲप्लिकेशनचा वापर करण्याबाबत माहिती देण्यात आली आहे.
  - उद्योग विभागातर्फे मैत्री २.० पोर्टलवर AI आधारित Chatbot ची माहिती अधिकारी/ कर्मचारी यांना देण्यात आली आहे
- कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) सुरु करणे
  - अपुऱ्या मनुष्यबळामुळे कर्मचारी व अधिकारी ChatGPT चा वापर करत आहेत.

# नावीन्यपूर्ण उपक्रम

- QR Code आधारित महाराष्ट्र राज्य विविध धोरणे

  - कार्यालयात महाराष्ट्र राज्याचे विविध धोरणे QR Code असणाऱ्या माहिती भित्तिपत्रकान्वये नवउद्योजक व अभ्यागतांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत

## Maharashtra: Dynamic Policy Ecosystem

Maharashtra Logistic Policy 2024

Maharashtra State Export Promotion Policy 2023

New IT and ITES Policy of Maharashtra State 2023

Textile Policy 2023

Green Hydrogen Policy 2023

Electric Vehicle Policy 2021

Industrial Policy 2019

Aerospace & Defence Policy 2018

Kindly scan QR Codes to download

## Important Links

ODOP Coffee Table Booklet

MAITRI Single Window System Booklet


IGNITE 2023 Booklet


District Investment Summit 2024

Magnetic Maharashtra

MAITRI Contact Us

➢ जिल्हा उद्योग केंद्र मार्फत राबविल्या जाणाऱ्या सर्व योजनांचा व्यापक प्रचार प्रसार करण्यासाठी आणि उद्योजकांना योजनांचा लाभ देण्यासाठी सर्व योजनांचे माहितीपुस्तक/ बुकलेट चे प्रकाशन



## पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम

**प्रकल्प मर्यादा -**
उत्पादन प्रक्रिया असलेले उद्योग प्रकल्प किंमत ५० लाख मर्यादेत अनुदान देय
सेवा उद्योग – जास्तीत जास्त प्रकल्प किंमत रुपये वीस लाख मर्यादित अनुदान देय
**टिप -** प्रकल्प अहवालातील स्थिर भांडवली गुंतवणूक मर्यादा कमीत कमी ६०% व खेळते भांडवल प्रकार किमतीच्या जास्तीत जास्त ४०% असेल.

**आर्थिक मदतीचे स्वरुप -**

| अ.क्र. | लाभार्थी संवर्ग | स्वगुंतवणूक प्रकल्प किंमतीच्या मर्यादेत | बँक कर्ज | ग्रामीण भागातील अनुदान | शहरी भागातील अनुदान |
|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण प्रवर्ग | 10 % | 90 % | 25 % | 15 % |
| २ | राखीव प्रवर्ग अनुसूचित जाती जमाती इतर मागासवर्ग विमुक्त जाती व भटक्या जमाती अल्पसंख्यांक महिला माजी सैनिक अपंग | 5 % | 95 % | 35 % | 25 % |


**योजनेचे पात्र लाभार्थी - वैयक्तिक लाभार्थी**

**पात्रतेच्या अटी**
१. सर्वसाधारण प्रवर्गातील अर्जदाराचे वय १८ असावे.
२. उत्पादन प्रक्रिया असलेले उद्योग प्रकल्प किंमत रुपये १० लाखापेक्षा जास्त असल्यास व सेवा उद्योग प्रकल्प किंमत रु. ५ लाखापेक्षा जास्त असल्यास किमान शैक्षणिक पात्रता इयत्ता आठवी पास असणे आवश्यक.
३. अर्जदाराने केंद्र राज्य शासनाच्या कोणत्याही योजनेमध्ये अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.
४. केवळ नवीन उद्योगाकरिता सदर योजनेचा लाभ देय आहे.

**आवश्यक कागदपत्रे -** १. पासपोर्ट साईज फोटो २. आधार कार्ड ३. शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र /शाळा सोडल्याचा दाखला ४. जात प्रमाणपत्र ५. माजी सैनीक, अपंग करिता सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र ६. ग्रामीण भागाकरिता लोकसंख्येचा दाखला (ग्रामसेवक यांचा) ७. प्रकल्प अहवाल

**टीप -** प्रस्ताव बँकेकडे पाठवण्याकरिता अर्जदाराने प्रकल्प किंमत १० लाखापर्यंत किमान ५० गुण मिळवणे आवश्यक आहे व प्रकल्प किंमत १० लाखाच्या पुढे किंवा ६० गुण मिळवणे आवश्यक आहे.

**गुणपत्रकाकरिता कागदपत्रे :-** १. रेशनकार्ड/कुटुंब सदस्यसंख्या स्वघोषणापत्र २. घराचा पुरावा (स्वतःचे किंवा पालकांचे नावे असल्यास)–करपावती/ ८/अ योग्य तो पुरावा ३. रहिवासी प्रमाणपत्र /डोमिसाईल सर्टिफिकेट ४. सदर व्यवसायाचे अनुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र ५. स्वतःचे इन्कम टॅक्स रिटर्न ६ कुटुंबाचा उत्पादनाचा इतर मार्ग असल्यास आवश्यक पुरावा. (उदा. इन्कम टॅक्स रिटर्न / फॉर्म १६) ७. जीवन विमा असल्यास पुरावा एक पेक्षा जास्त असल्यास सर्व पॉलिसीच्या पुरावा ८. कर्जाकरिता अर्जात नमूद केलेल्या बँकेत खाते असल्यास खाते कोणत्या दिनांक पासून आहे याबाबत पुरावा. (पासबुकचे प्रथम पान/बँकेचे प्रमाणपत्र) ९. क्रेडिट हिस्टरी (सिबिल स्कोर) असल्यास १०. उद्योगाचे ठिकाण कच्चामाल, बाजारपेठ, रस्ते, पाणी, वीज, कामगार इत्यादी अनुषंगाने योग्य असले बाबत हमीपत्र. ११. RESTI / ITS / EDTP /REDP / संगणक अर्हता प्रमाणपत्र असल्यास विक्रीकरिता करार केले असल्यास आवश्यक तो पुरावा. १२ शासकीय यंत्रणाकडे उद्योगाची नोंदणी केली असल्यास पुरावा. उदा.– GST, SHOP ACT १३. नियोजित कर्ज परतावा स्टेटमेंट (प्रकल्प अहवालातील) १४. Avg. DSCR (प्रकल्प अहवालातील) १५. १० लाख मर्यादेपेक्षा जास्त कर्जाकरिता गहाण खत/collateral security coverage देणार असल्यास आवश्यक तो पुरावा उदा. प्लॉट/घर इ. उतारा व मूल्यांकन अहवाल १६. गरजेनुसार मागणी केल्यास कागदपत्र सदर योजनेंर्तगत अर्ज करण्यासाठी https://kviconline.gov.in/pmegpepotral/pmegphome/index.jsp संकेतस्थळावर अर्ज दाखला करावे. संकेतस्थळावर योजनेबाबत अधिकच्या तपशील उपलब्ध आहे.



## सुधारित बीज भांडवल योजना

**पात्रता -**
१. अर्जदार किमान सातवी पास असावा २. वयोमर्यादा १८ ते ५० वर्ष
३. उमेदवार बेरोजगार असावा. ४. उमेदवाराचे महाराष्ट्रात १५ वर्ष वास्तव्य असावे.

**ठळक वैशिष्ट्य -**
१. योजनेत पात्र उद्योग / व्यवसायाच्या प्रकल्प खर्चाची कमाल मर्यादा रु. २५ लाख राहील व त्यात एकूण स्थिर भांडवली गुंतवणूक व खेळत्या भांडवलाचे सीमांतिक भांडवल अंतर्भूत राहील.
२. बीजभांडवल १५% प्रमाणे जास्तीत जास्त रु.३ लाख ७५ हजार रुपये पर्यंत मिळेल.
३. दहा लाख रुपयापेक्षा कमी प्रकल्प खर्च असलेल्या प्रमाणांमध्ये अनुसूचित जाती / जमाती / इतर मागासवर्गीय/अपंग/भटक्या विमुक्त जाती/जमातीसाठी बीज भांडवल प्रकल्पांचे २० टक्के अनुज्ञेय राहील.
४. कर्जफेड, कर्ज दिल्यानंतर व्यापार व सेवा उद्योगासाठी सहा महिन्यांचा विलंब अवधी नंतर ६ महिन्यांपासून ४.५ वर्षांपर्यंत व लघु उद्योगासाठी ३ वर्षाच्या विलंब अवधी नंतर ३ ते ७ वर्षात परतफेड ५ हप्त्यात करावयाची आहे.
५. बीज भांडवल कर्जासाठी व्याजाचा दर दसादशे सहा टक्के असून नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थीस ३% सवलत देण्यात येईल, व थकबाकीदारास १% दंड व्याज आकारण्यात येईल.
६. बीज भांडवल कर्जाचा गैरवापर करणाऱ्यास २% दंडव्याज लावून एकरकमी वसुली करण्यात येईल. थकीत बीज भांडवल वसुलीसाठी महसुली कार्यवाही करण्यात येईल.
७. बीजभांडवल कर्ज मंजुरीनंतर जिल्हा उद्योग केंद्राचे नावे दुसरा अधिभार नोंदणे आवश्यक.

**आवश्यक कागदपत्रे -**
१. विहित अर्ज २. शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र ३. सेवायोजन नोंदणी पत्र ४. आधार कार्ड ५. पॅन कार्ड ६. रेशन कार्ड ७. मतदान ओळखपत्र ८. रु. १०० च्या स्टॅम्प पेपर वर शपथपत्र नोटरी करून ९. यंत्रसामग्री/फर्निचर/मालाचे कोटेशन १०. दुग्ध व्यवसायासाठी नोंदणीकृत संस्थेचे हमीपत्र ११. अनुसूचित जाती/जमाती करिता जात प्रमाणपत्र १२. वाहना करिता परिवहन खात्याचा परवाना १३. वाहना करिता स्थायी ड्रायव्हिंग लायसन १४ प्रकल्प अहवाल

## उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम

सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जातो. सदर प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शक शिबिरे व प्रशिक्षण शिबिरे घेतली जातात त्यामध्ये उद्योग/सेवा यांकरिता मार्गदर्शन देणे. जागेसंबंधी आवश्यक तरतुदी, प्रकल्प अहवाल तयार करणे. निरनिराळे परवाने मिळविण्याच्या पद्धती, विक्रीकरिता आवश्यक बाबी इत्यादी बाबत उपयुक्त माहिती दिली जाते. या योजनेमध्ये महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र मिटकॉन व उद्योग संचालनालयाने मान्यता दिलेल्या अशासकीय कुशल प्रशिक्षक संस्थांमार्फत प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येतात. सुशिक्षित बेरोजगारांना विद्यावेतन रु. १००० प्रति माह देण्यात येते.